# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 03 April 2025

Time 01.00 to 01.05 PM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक ०३ एप्रिल २०२५ दुपारी १.०० वा.**

****

वक्फ सुधारणा विधेयक २०२५ आज राज्यसभेत माडलं जाणार आहे. लोकसभेनं काल प्रदीर्घ चर्चेनंतर हे विधेयक पारित केलं.

दरम्यान, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी, हे विधेयक मुस्लिमांना बाजूला सारण्याचं आणि त्यांच्या वैयक्तिक कायदे आणि मालमत्ता अधिकार हिरावून घेण्याचं एक शस्त्र असल्याचं म्हटलं आहे. समाज माध्यमावरच्या संदेशात त्यांनी, काँग्रेस पक्षाने या विधेयकाचा तीव्र विरोध दर्शवला असून, हे संविधानावर हल्ला असल्याचं नमूद केलं.

****

सहाव्या बिमस्टेक शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आज थायलंडची राजधानी बँकॉक इथं पोहोचले. भारतीय समुदायाने त्यांचं उत्साहात स्वागत केलं. उद्या होणार्या या शिखर परिषदेत बँकॉक व्हिजन २०३० स्वीकारलं जाईल आणि बिमस्टेकची भविष्यातील दिशा ठरवण्यासाठी बिमस्टेक प्रख्यात व्यक्तींच्या गटाचा अहवाल देखील मंजूर केला जाईल. आगामी अधिकृत कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यास आणि भारत आणि थायलंडमधले सहकार्याचे बंध मजबूत करण्यास उत्सुक अलस्याचं पंतप्रधानांनी, सामाजिक माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. आज संध्याकाळी पंतप्रधान मोदी, थायलंडचे पंतप्रधान शिनावात्रा यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करतील. या प्रसंगी अनेक करारही होणार आहेत. या परिषदेनंतर पंतप्रधान उद्या श्रीलंकेला तीन दिवसांच्या दौऱ्यासाठी रवाना होणार आहेत.

****

महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेची निवडणूक आज होत आहे. या निवडणुकीत नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकांनी मतदानाचा हक्क बजावण्याचं आवाहन, वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्य विभागाचे सचिव धीरज कुमार यांनी केलं आहे. सर्वोच्च न्यायालयानं विद्यमान निर्वाचन अधिकाऱ्यांऐवजी अवर सचिव स्तराचे नवीन निर्वाचन अधिकारी तात्काळ नियुक्त केल्यास निवडणूक प्रक्रिया पुढे सुरू ठेवता येईल असे निर्देश काल दिले. न्यायालयाच्या या आदेशानुसार महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या निवडणूक घेण्याकरता वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्य विभागाचे अवर सचिव सुनीलकुमार धोंडे यांची नियुक्ती निर्वाचन अधिकारी म्हणून करण्यात आली आहे.

****

मुख्यमंत्र्यांच्या १०० दिवस कृती आराखड्याअंतर्गत पाणी पुरवठा आणि स्वच्छता विभागाची उद्दिष्टपूर्तीकडे यशस्वी वाटचाल सुरू असल्याची माहिती, या विभागाचे मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिली. काल मुंबईत यासंदर्भातल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. जलजीवन मिशन अंतर्गत ‘हर घर जल’ योजनेतील नळ जोडणी आणि नळ पाणीपुरवठा योजनेच्या अंमलबजावणीसह योजना माहिती फलक, स्रोतांचे शंभर टक्के जिओ-टॅगिंग पूर्ण करण्याच्या प्रगतीचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभागाच्या बहुतेक सर्व योजनांचं उद्दिष्ट ९० ते ९५ टक्के पूर्ण झाले असून, उर्वरित उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी विशेष नियोजन करण्याची सूचना पाटील यांनी दिली.

****

लातूर इथं विभागीय क्रीडा संकुल उभारण्यासाठीची कार्यवाही जलद गतीने करण्याचे निर्देश क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले आहेत. काल मंत्रालयात याबाबतच्या विशेष बैठकीत ते बोलत होते. या संकुलात नवीन क्रीडा सुविधा निर्माण करण्याकरता प्रत्यक्ष जागेची पाहणी करून, मुलभूत सेवांना प्राधान्य देण्यात यावं, क्रीडापटूंसाठी मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून अद्ययावतीकरण करण्यात यावं, इतर सुविधा उपलब्ध करून देण्यासाठीही टप्प्या-टप्प्याने विकास करण्याबाबत भरणे यांनी सूचना केल्या. आमदार अमित देशमुख यावेळी उपस्थित होते.

****

मुंबई विमानतळावर सीमा शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी सुमारे दीड किलो कोकेन जप्त केलं, ज्याची किंमत साडे सतरा कोटी रुपये आहे. या प्रकरणी एका केनियन महिलेला अटक करण्यात आली आहे.

****

जालना जिल्ह्यात अंबड तालुक्यातल्या भणंगजळगावचे ग्रामविकास अधिकारी जयसिंग राठोड याला पाच हजार रुपयांची लाच स्वीकारताना पकडण्यात आलं. वारसाहक्काचं प्रमाणपत्र देण्यासाठी त्यांनी ही लाच मागितली होती.

****

आंतरराष्ट्रीय नेमबाजी महासंघ - आय एस एस एफ करंडक स्पर्धा आजपासून अर्जेटिंनात ब्युनॉस आयर्स इथं सुरू होत आहे. भारताची ऑलिंपिक विजेती नेमबाज मनू भाकर भारताच्या संघाचं नेतृत्व करणार आहे. स्पर्धेत ४५ देशांमधले चारशे नेमबाज सहभागी होत आहेत. भारताचे सौरभ चौधरी, अनिश भंवाला यांच्यासह ४३ नेमबाज स्पर्धेत सहभागी होणार आहेत.

****

आयपीएल टी-२० क्रिकेटमध्ये आज संध्याकाळी कोलकाता नाईट रायडर्सचा सामना सनरायझर्स हैदराबादशी होणार आहे. कोलकाता इथं ईडन गार्डन्सवर होणारा हा सामना संध्याकाळी साडेसात वाजता सुरू होईल.

दरम्यान, या स्पर्धेत काल झालेल्या सामन्यात गुजरात टायटन्सने रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूचा ८ खेळाडू राखून पराभव केला.

****

हवामान

राज्याच्या जवळपास सर्वच भागात आज अवकाळी पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह गारपीट होण्याचीही शक्यता आहे.

****